1286
18-11-21

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University
सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
ईमेल : dbee@sus.ac.in
☏: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००
संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in
विस्तारीत क्रमांक : १३०
परीक्षा व मूल्यमापन मंडळ ◉ Board of Examinations and Evaluation

**परिपत्रक क्र. 55**

वाचा : विद्यापीठाचे Notification क्र.SUS/Estt/२०१९/१९४२, दिनांक ०७/०३/२०१९.

प्रस्तुत विद्यापीठाशी सर्व संलग्नित महाविद्यालयांना व विद्यापीठ परीसरातील शैक्षणिक संकुलाना कळविण्यात येते की, परीक्षा व मूल्यमापन विभागाकडून महाविद्यालयांना / संकुलांना प्रात्यक्षिक व लेखी परीक्षेसाठी सोलापूर विद्यापीठ, सोलापूर या नावांची उत्तरपत्रिका व इतर छापील स्टेशनरी पुरविण्यात आलेली आहे. परंतू दरम्यानच्या कालावधीत विद्यापीठाच्या दिनांक ०७/०३/२०१९ रोजीच्या Notification नुसार सोलापूर विद्यापीठ, सोलापूर या नांवाचा नामविस्तार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर असा झालेला आहे. यास्तव आपणास पुरविण्यात आलेली उत्तरपत्रिका व इतर छापील स्टेशनरी आपल्या महाविद्यालयात / संकुलात शिल्लक असल्यास ती विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन विभागातील गोडवून विभागाकडे जमा करावी लागणार आहे.

सबब सोलापूर विद्यापीठ, सोलापूर या नावांची उत्तरपत्रिका व इतर छापील स्टेशनरी आज रोजी आपल्या महाविद्यालयात / संकुलात शिल्लक असल्यास ती विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन विभागातील गोडवून विभागाकडे दिनांक ०६/१२/२०२१ पर्यंत जमा करावी. तसेच उत्तरपत्रिका व इतर छापील स्टेशनरी मोठयाप्रमाणात असल्यास त्याची माहिती विद्यापीठ प्रशासनास उलट टपाली त्वरित कळवावी. भविष्यात सोलापूर विद्यापीठ, सोलापूर या नावांच्या उत्तरपत्रिका व इतर छापील स्टेशनरी संदर्भात तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्या महाविद्यालयाची / संकुलाची राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

जा. क्र. पुअहोसोविसो/परीक्षा/२०२१/ 1453
दिनांक 18 NOV 2021

( डॉ. शिवकुमार गणपूर )
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रति,
१) मा. प्राचार्य/प्राचार्या, सर्व संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. संचालक/अधिविभाग प्रमुख, विद्यापीठ परिसरातील सर्व शैक्षणिक संकुले.

प्रत माहितीस्तव :-
१) परीक्षा व मूल्यमापन विभागातील परीक्षा पूर्व विभाग/परीक्षा कालीन विभाग/संगणक विभाग.
२) परीक्षा व मूल्यमापन विभागातील आवक विभाग, सदरील परिपत्रक परीक्षा व मूल्यमापन विभागातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या निदर्शणास आणून द्यावे.
३) संगणक विभाग सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर अपलोड करण्याची कार्यवाही करावी.

Scanned by CamScanner